# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र. १८/२०२५ दिनांक १३/०१/२०२५

## ड्रग्जची तस्करी करणाऱ्या नायजेरीयन नागरीकास पकडण्यात आचोळे पोलीसांना यश

दिनांक ०७/०१/२०२५ रोजी मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे पोलीस ठाणे हद्दीमध्ये अंमली पदार्थ विक्री व सेवन, बंगलादेशी नागरीकांचे वास्तव्य तसेच नायजेरीयन नागरीकांकडुन होणाया ड्रग्ज विक्रीबाबत आचोळे पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना गुन्हे प्रतिबंधक गस्त करुन कारवाई करण्याच्या सुचन दिल्या होत्या. त्याप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार पोलीस ठाणे हद्दीमध्ये गस्त करीत होते. दरम्यान गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, नालासोपारा रेल्वे स्टेशनच्या पुर्व बाजुस एक नायजेरीयन नागरीक हा मेफेड्रॉन (एम.डी) या अंमलीपदार्थाची विक्री करण्यासाठी येणार आहे. मिळालेल्या माहिती बाबत गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या अधिकारी यांनी मा. वरिष्ठांना अवगत करुन मा. वरिष्ठांचे परवाणगीने नमुद नायजेरीयन नागरीकावर कारवाई करण्यासाठी सापळा रचला.

दिनांक ०७/०१/२०२५ रोजी दुपारच्या सुमारास कॅनरा बँक ए.टी.एम.चे समोर, स्टेशन रोड,नालासोपारा पु. येथे एक नायजेरीयन नागरीक संशयीत रित्या उभा असल्याचे दिसुन आले. त्यावेळी गुप्त बातमीदाराने माहिती दिल्या प्रमाणे त्यास गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या अधिकारी अंमलदार यांनी ताब्यात घेतले. लागलीच नमुद नायजेरियन नागरीक याची अंगझडती घेतली असता त्याचेकडे २२ ग्रॅम ०२ मिलीग्रॅम इतक्या वजानाचा मेफेड्रॉन (एम.डी) हा अंमलीपदार्थ मिळुन आला. सदर वेळी त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने ॲन्थोनी चिजीको न्वाफोर, वय-४६ वर्षे व्यवसाय-ब ेरोजगर रा. नालासोपारा पु. परिसरात जेथे जागा मिळेल तेथे असा अपुर्ण पत्ता सांगुन सध्या राहण्याचा व मुळ राहण्याचा पत्ता सांगणेस टाळा टाळ केली. त्यास पुढील कारवाई करीता ताब्यात घेवुन त्याचेकडुन २,६९,३४०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन त्याचे विरुध्द आचोळे पोलीस ठाणे, गुन्हा रजि. क्र. १६/२०२५ गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८(क), २१ (ब) प्रमाणे दिनांक ०७/०१/२०२५ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. मधुकर पाण्डे, पोलीस आयुक्त सो, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त सो, मा. श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त परिमंडळ- २, मा.श्री. उमेश माने-पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजितकुमार पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आचोळे पोलीस ठाणे, पोनि/विशाल खैरे (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/यशपाल सुर्यवंशी,पोउनि/मंगेश वडणे, पोहवा/दत्तात्रय दाईंगडे, पोहवा/शंकर शिंदे, पोहवा/निखील चव्हाण, पोअं/विनायक कचरे, पोअं/अमोल सांगळे, पोअं/मोहनदार बंडगर,पोअं/मनोज पाईकराव, पोअं/गोविंद गुट्टे, पोअं/लोकेश कुवर, मपोशि/जनाबाई हिवाळे यांनी यशस्वी रित्या केलेली आहे.

---------------oo--------------------